| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br>**प्रेसनोट** | 2025<br>CB/ 28/2025 |
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक २१.०५.२०२५** |

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील हरवलेल्या महिला व बालकांसाठी ''ऑपरेशन शोध'' मोहिम राबविणेबाबत.**

---

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील हरवलेल्या महिला व बालकांच्या संदर्भात विशेषत: १ वर्ष उलटुन गेलेल्या महिलांच्या प्रकरणी गांभीर्याने लक्ष घालुन महिला व बालकांचा शोध घेण्यासाठी ''ऑपरेशन शोध'' हि विशेष मोहिम दिनांक १७/०४/२०२५ ते दिनांक १५/०५/२०२५ या कालावधीत आयुक्त स्तरावर राबविण्याबाबत आदेशीत केले होते.

त्यानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालय स्तरावर ''ऑपरेशन शोध'' साठी पोलीस ठाणे स्तरावर एकूण २० पथके व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील २ पथके तयार करण्यात आली होती.

''ऑपरेशन शोध'' मोहिमेअंर्तगत हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यासाठी

१) मा.बाल कल्याण समिती, कर्जत, ठाणे, उल्हासनगर,

२) मा. अधीक्षक, बाल निरीक्षण गृह, रायगड, ठाणे,

३) तसेच नवी मुंबई आयुक्तालयातील विविध एनजीओ यांच्याशी समन्वय साधुन शोध मोहिम राबविण्यात आली होती.

दरम्यान गुन्हे शाखा तसेच पोलीस ठाणे स्तरावर '' ऑपरेशन शोध '' मोहिमेअंर्तगत विशेषत: हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यात आला. त्यामध्ये २१३ महिला, ९५ पुरुष, १० अपहृत मुले, १२ अपहृत मुली असे एकुण ३३० मिळुन आले आहेत.

नवी मुंबईतील हरवलेल्या महिला व बालकांबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरीकांनी १०३ या हेल्पलाईन वर माहिती देण्याचे नवी मुंबई पोलीसांकडुन आवाहन करण्यात येत आहे.

★★★★★★★★★★